क्रमांक कार्या-२/आस्था-१/कावि/ ५८४ /२०२१
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा
दि.१६/०६/२०२१

# जाहिर सूचना

--०--

जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची स्वतंत्र तसेच सामाईक प्रतिक्षा सूची (गट — 'क' व गट- 'ड') ठेवण्यात आलेली आहे. सदर प्रतिक्षासूची या कार्यालयाचे bhandara.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर अनुकंपा प्रतिक्षासूची (गट —'क') मधून या कार्यालयाचे आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील दोन पदे ज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. त्या अनुषंगाने वरील भंडारा जिल्हयातील अनुकंपा सामाईक प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना सूचीत करण्यात येते की, जे उमेदवार वाहनचालक सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता धारण करित आहेत, तसेच ज्या उमेदवारांकडे सदर पदास आवश्यक तद्अनुषंगीक प्रमाणपत्र उपलब्ध आहेत, परंतु त्यांनी अनुकंपा यादीमध्ये सदर प्रमाणपत्रांची नोंदणी केलेली नाही. अशा उमेदवारांनी नोंदणीकरिता तसेच सदर प्रतिक्षासूची अद्ययावत करण्याकरिता आपली कागदपत्र / प्रमाणपत्र **दिनांक ०४/०७/२०२१** पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथील आस्थापना शाखेत सादर करावे.

सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक ०२ मार्च, २०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील "वाहनचालक" (मोटार कार आणि जीप्स), गट —क या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे नियम (३) (ग) नुसार वाहनचालक पदाकरिता नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी **अटी व शर्ती** पुढील प्रमाणे आहेत :

**नियम (३) ( ग) :-**

(एक) ज्यांचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नाही,

(दोन) ज्यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण केला आहे,

(तीन) ज्यांनी शासन मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे,

(चार) ज्यांनी शासकीय, निमशासकीय किंवा, खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केला आहे,

(पाच) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान आवश्यक आहे,

(सहा) ज्यांचा वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख आहे व ज्यांचेकडे चांगली शारीरिक क्षमता आहे,

टिप :- "वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख" यामध्ये खालील बाबी येतात : -

जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.

(१) वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किंवा अल्कोहोल सेवन करुन वाहनचालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम , १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा,

(२) वाहनचालकाविरुध्द अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

(सात) ज्यांना संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलीक माहिती आहे, आणि

(आठ) ज्यांना मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे:

परंतु सदर पदावरील नियुक्तीसाठी खंड (ग) च्या उपखंड (चार) नुसार विहित केलेल्या कालावधीचा अनुभव धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, निवड समितीच्या शिफारशीनुसार अनुभव कालावधी १ वर्षापर्यंत शिथील करता येईल.

**नियम — ४** :- नियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने नियुक्तीच्या वेळी वाहन चालविण्याची चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**नियम — ६** :- नियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावर नियुक्त होणारी व्यक्ती शारीरिक दृष्टया पात्र असावी तसेच दृष्टिने चांगली असणे आवश्यक राहील. तो राचआंधळेपणा व रंग आंधळेपणा या व्याधींनी ग्रस्त नसावा. त्याने नियुक्तीपूर्वी शारिरिकदृष्टया पात्र असल्याचे व दृष्टि चांगली असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

दिनांक :- /०६/२०२१
स्थळ :- भंडारा

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, भंडारा.

(संदीप कदम)
**जिल्हाधिकारी, भंडारा**